# हॅलो जनता

जळगांव > पाचोरा > भडगांव > चाळीसगांव > चोपडा

संपादक : प्रमोद रूले (मोबा. 86003 08161)


**सुविचार -**

स्वतःवर विश्वास ठेवा,
कारण ताकद तुमच्यातच आहे,
हिम्मत ठेवून पुढे चला,
जग जिंकणं अशक्य नाही.


मंगळवार, १४ एप्रिल, २०२६ | ● वर्ष - पहिले | ● अंक ०३ | ● पृष्ठ ०४ | ● मूल्य - २ रूपये | ● www.hellojanata.com.




## गरजू एससी विद्यार्थ्यांसाठी १४ ते २१ एप्रिल 'मोफत शिक्षण सप्ताह' जाहीर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त श्री संत ज्ञानेश्वर प्राथमिक व माध्यमिक विद्यालयाच्या वतीने गरजू एससी प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी १४ एप्रिल ते २१ एप्रिल दरम्यान 'मोफत शिक्षण सप्ताह' राबविण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली आहे. या उपक्रमांतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल व गरजू विद्यार्थ्यांना मोफत शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. कोणताही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे संस्थेच्या वतीने सांगण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष प्रशांत नाईक यांनी माहिती देताना सांगितले की, "डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना अभिवादन म्हणून हा उपक्रम राबविण्यात येत आहे. समाजातील सर्व घटकांपर्यंत शिक्षण पोहोचवणे हीच खरी जयंती साजरी करण्याची भावना आहे." या उपक्रमाचे पालक व नागरिकांकडून स्वागत होत असून, अधिकाधिक विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थेकडून करण्यात आले आहे

# गो तस्करांना मदत करणाऱ्यांवर कठोर कारवाई करा : रोहित निकम.

**हॅलो जनता प्रतिनिधी**

चोपडा शहरातील के.जी.एन कॉलनी परिसरात कत्तलीच्या उद्देशाने बांधून ठेवलेले सुमारे ७० गोवंश अज्ञात व्यक्तींनी पळवून नेल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. दि. १३ एप्रिल रोजी दिलेल्या अर्जात माळी यांनी नमूद केले आहे की, संबंधित ठिकाणी गोवंश कत्तलीसाठी बांधून ठेवण्यात आले होते. त्याचवेळी काही लोकांनी पोलीस प्रशासनाच्या समोरच हे गोवंश पळवून नेले. यावेळी गोरक्षक व पोलीस प्रशासनावर प्राणघातक हल्ला करण्यात आल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. घटनेचा व्हिडिओ, जीपीएस प्रणालीद्वारे नोंदवलेले लोकेशन आणि छायाचित्रे पुरावा म्हणून उपलब्ध असल्याचे अर्जात नमूद करण्यात आले आहे. चोपडा परिसरात यापूर्वीही अशा प्रकारच्या घटना घडल्याचा दावा करत वारंवार तक्रार करूनही योग्य कारवाई होत नसल्याचा आरोप माळी यांनी केला आहे. तसेच गोवंश पळवणाऱ्या व्यक्तींवर तसेच त्यांना मदत करणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांवरही कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. पळवून नेलेले गोवंश तात्काळ गोशाळेत जमा करण्याची मागणीही करण्यात आली आहे. दरम्यान, या घटनेच्या पार्श्वभूमीवर पणन महासंघाचे उपाध्यक्ष व भाजप महाराष्ट्र राज्य सहकार आघाडीचे सह-संयोजक रोहित निकम यांनी पोलीस उपविभागीय अधिकारी अण्णासाहेब घोलप यांना निवेदन दिले. त्यांनी चोपडा तालुक्यात गावठी गायींचे बळजबरीने उद्ध्वस्तीकरण, गोरक्षकांवर हल्ले व धमक्या दिल्या जात असल्याचा आरोप केला आहे. तसेच गौहत्या प्रतिबंधक कायद्याची कठोर अंमलबजावणी करण्याची मागणी त्यांनी केली आहे. मात्र, या प्रकरणी पोलीस उपविभागीय अधिकारी अण्णासाहेब घोलप यांनी वेगळेच चित्र मांडले आहे. त्यांनी सांगितले की, आतापर्यंत १२ गोवंश ताब्यात घेण्यात आले असून गोरक्षकांवर दगडफेक किंवा हल्ला झाल्याचे कोणतेही पुरावे नाहीत. त्यामुळे हल्ल्याचे आरोप त्यांनी फेटाळून लावले आहेत.

## गोरक्षकांना त्रास देणाऱ्यांना माफी नाही....




उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांना निवेदन देताना पणन महासंघाचे उपाध्यक्ष रोहित निकम

**मुख्यमंत्री महोदयांसमोर विषय मांडणार – रोहित निकम...**

**गौहत्या प्रतिबंधक कायद्याची पायदळी तुडवली जात आहे. गावठी गायींचे बळजबरीने उद्ध्वस्तीकरण तात्काळ थांबवावे. गोरक्षकांवरील सर्व गुन्हे रद्द करावेत. गौहत्या प्रतिबंधक कायद्याची कठोर अंमलबजावणी करावी.**

**यांची होती उपस्थिती...**

**भाजप गटनेते गजेंद्र जैस्वाल, शरद पाटील, अनिल वानखेडे, सागर नेवे, जिग्नेश कंखरे, संग्राम परदेशी, श्याम सोनार, मनीष गुजराथी, हरीश माळी, प्रेम घोगरे, विशाल भावसार, मनोहर बडगुजर, अशोक शिंपी, कमलेश सोनवणे, विशाल भोई यांसह पदाधिकारी आणि गोरक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.**







# येथेच आहे...... आपली आशा

मुंबई, हॅलो जनता न्यूज नेटवर्क. एक असा आवाज, ज्याने भावनांच्या शब्दकोशातील प्रत्येक भावनेला जिवंत केले. एक असा आवाज, ज्याने हिंदी पार्श्वगायनात पदार्पण करताच दिग्गज गायिकांमध्ये आपले स्थान निर्माण केले. एक आवाज, जो वयाच्या ७० व्या वर्षी, एका कॉलेजला जाणाऱ्या मुलीच्या रोमँटिक उत्कटतेचा भाव बनला. १२ भाषांतील शेकडो गाणी अजरामर करणारा, नटखट, खट्याळ आणि हरहुन्नरी आशा भोसले यांचा आवाज रविवारी दुपारी वयाच्या ९२ व्या वर्षी शांत झाला. ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांचे मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात निधन झाले. त्यांना शनिवारी संध्याकाळी हृदयविकाराचा तीव्र झटका आला होता. त्यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू होते.

**आज अंत्यसंस्कार**

रविवारी सकाळी ११ वाजतापासून लोअर परेल येथील त्यांच्या 'कासा ग्रांडे' या निवासस्थानी त्यांचे पार्थिव अंतिम दर्शनासाठी ठेवण्यात आले आहे. आज, सोमवारी संध्याकाळी ४ वाजता दादर येथील ऐतिहासिक शिवाजी पार्क येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येतील. रविवारी दुपारी त्यांची प्राणज्योत मालवली. आशा भोसले यांचे पुत्र आनंद भोसले यांनी सांगितले की, सोमवारी दुपारी ४ वाजता शिवाजी पार्क येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. तत्पूर्वी त्यांच्या पार्थिवाचे अंतीम दर्शन सोमवारी सकाळी ११ पासून घरीच घेता येणार आहे. ब्रीच कँडी रुग्णालयाचे डॉ. प्रतीक समदानी यांनी सांगितले की, आशा भोसले यांच्या शरिरात अनेक वैद्यकीय गुंतागुंती निर्माण झाल्या. त्यामुळे मल्टी-ऑर्गन फेल्युअरमुळे त्यांचे निधन झाले.

## स्वतःच्या अटींवर जगल्या



आशा भोसलेजी यांच्या निधनामुळे संगीत विश्वात एक मोठी पोकळी निर्माण झाली आहे. एक दिग्गज गायिका म्हणून, त्यांच्या गौरवशाली कारकिर्दीने भारतातील संगीताचा एक संपूर्ण कालखंडच परिभाषित केला. त्यांच्याशी झालेल्या माझ्या वैयक्तिक भेटीगाठींच्या अत्यंत सुखद आठवणी मी जपल्या आहेत. एक कलाकार आणि एक माणूस म्हणूनही त्यांनी आपले आयुष्य आपल्या स्वतःच्या अटींवर जगले, त्यांचे संगीत सदैव अमर राहील. त्यांचे निधन ही संगीतप्रेमींसाठी कधीही भरून न येणारी हानी आहे. - द्रौपदी मुर्मू, राष्ट्रपती

## पिढ्यांना प्रेरणा मिळेल




आशा भोसले या भारतातील सर्वात आदरणीय आणि अष्टपैलू आवाजांपैकी एक होत्या. त्यांच्या संगीत प्रवासाने अनेक दशके भारतीय सांस्कृतिक वारसा समृद्ध केला. त्यांच्या भावपूर्ण गाण्यांनी आणि चैतन्यमय संगीताने जगभरातील लाखो लोकांची मने जिंकली. आशाजीसोबतच्या आपल्या भेटी नेहमीच अविस्मरणीय झाल्या, त्यांचे योगदान येणाऱ्या पिढ्यांना प्रेरणा देत राहील. त्यांच्या आत्म्यास शांती लाभो, अशी प्रार्थना! नरेंद्र मोदी, पंतप्रधान

## आवाजातून सदैव आपल्यात




महान गायिका आशा भोसले यांच्या निधनाची बातमी अत्यंत दुःखद आहे. त्यांची कला त्यांच्या आवाजातून आपल्यात सदैव अमर राहील. या दुःखद प्रसंगी त्यांच्या शोकाकुल कुटुंबीयांप्रति आणि चाहत्यांप्रति माझ्या संवेदना - राहुल गांधी, विरोधी पक्षनेते, लोकसभा

## आशाताईंच्या स्वरात परमेश्वर



सर्वात व्हर्सटाईल गायिका म्हणून आशाताईंचा लौकिक होता. आशाताईंनी 'तोरा मन दर्पण कह लाये' अशा प्रकारचं क्लासिकल गाणंही म्हटलं आणि त्याचवेळी अतिशय आधुनिक गाणीही त्यांनी म्हटली, शास्त्रीय संगीत, पॉप, रॉक असो भावगीत असो २० पेक्षा जास्त भाषांमध्ये त्यांनी गाणी म्हटली. अतिशय जिंदादील व्यक्तिमत्व म्हणजे आशाताई होत्या. त्यांच्या स्वरांमध्ये परमेश्वर होता. अशा गायिकेचं जाणं ही अत्यंत दुःखद बाब आहे. - देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री

## घरात गायलेले भजन होतेय व्हायरल



**ब्रह्मा, विष्णू आणि महेश्वर... हे भजन नुकतेच आशा भोसले यांनी घरातल्या डायनिंग टेबलवर बसून गायले होते. काही दिवसांपूर्वीची ही एक संस्मरणीय भेट, असे म्हणत या गाण्याचा व्हिडिओ सांस्कृतिक कार्य मंत्री आशीष शेलार यांनी शेअर केला आहे.**

## उरले उरात काही आवाज चांदण्यांचे, आकाश तारकांचे उचलून रात्र गेली!

# आशाताई गेल्या! स्वरनक्षत्र निखळलं!!

दैवी स्वरांचं चांदणं पेरून सात दशकांहून अधिक काळ रसिकांच्या हृदयसिंहासनावर अधिराज्य गाजवणाऱ्या अलौकिक प्रतिभेच्या महान गायिका आशा भोसले यांनी आज अखेरचा श्वास घेतला. 'दम मारो दम'ची मस्ती ते 'तोरा मन दर्पण कहलाए'ची भक्ती अशा दोन स्वरध्रुवांवर लीलया प्रवास करणाऱ्या आशाताई गेल्या... 'स्वरनक्षत्र' निखळले, अशी हळहळ रसिकांनी व्यक्त केली. कॅब्रे असो वा भजन, गझल असो वा नाट्यसंगीत... आशा भोसले यांच्या गळ्याला कोणताच गानप्रकार वर्ज्य नव्हता. भारतरत्न स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर या ब्रॅडमन असतील तर आशाताई या गॅरी सोबर्स होत्या असे म्हटले जाई. सध्याच्या बॉलिवूडी गाण्यांच्या गोंगाटात ही अखेरची स्वरआशाही लोप पावली. स्वप्नांच्या प्रदेशातून आलेला हा सच्चा सूर पुन्हा स्वप्नांच्या गावी निघून गेला.



८ सप्टेंबर १९३३ - १२ एप्रिल २०२६

*शनिवारी सायंकाळी अस्वस्थ वाटू लागल्याने आशा भोसले यांना ब्रीच कॅण्डी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तेथे उपचार सुरू असताना आज सकाळी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. मृत्यूसमयी त्या ९२ वर्षांच्या होत्या.*

### २० भाषा... १२ हजार गाणी

आशाताईंनी १२ हजारांहून अधिक गाणी गायली. तीही वेगवेगळ्या २० भाषांमध्ये. त्यात भावगीत, नाट्यगीतं, गझल, कॅब्रेपासून सारं काही होतं. मराठी नाट्यसृष्टी आणि मराठी-हिंदी सिनेसृष्टीसाठी त्यांचे मोठे योगदान आहे. त्यांनी देशविदेशात अनेक मैफली गाजवल्या, कार्यक्रम केले. सर्वाधिक गाणी गाणारी गायिका अशी गिनीज वर्ल्ड बुकमध्ये त्यांची नोंद आहे.

### आज अंत्यसंस्कार

सोमवारी सकाळी ११ ते ३ या वेळेत लोअर परळमधील कासा ग्रँडे येथील निवासस्थानी आशाताईंचे पार्थिव अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात येणार आहे. दुपारी ४ वाजता छत्रपती शिवाजी महाराज पार्क दादर येथील स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत, अशी माहिती त्यांचे पुत्र आनंद भोसले यांनी दिली.




### संगीत विश्वातील अमर आवाज शांत झाला

#### उद्धव ठाकरे यांच्याकडून आशा भोसले यांना श्रद्धांजली

आशा भोसले यांच्या निधनाची बातमी ऐकून अत्यंत दुःख झाले. भारतीय संगीत विश्वातील एक अमर आवाज आज शांत झाला, अशा शोकभावना शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केल्या. "आशा भोसले यांच्या स्वरांनी अनेक पिढ्यांना आनंद दिला, भावनांना स्पर्श केला. त्या एक दिलखुलास व्यक्तिमत्त्व होते. लतादीदी यांच्यानंतर त्या संगीत क्षेत्रातील एका महान पर्वाच्या स्तंभाप्रमाणे उभ्या होत्या. भारतीय संगीत क्षेत्रातील हा स्तंभ कोसळला, त्यांचे गाणे हेच त्यांचे अमरत्व राहील," असे नमूद करत उद्धव ठाकरे यांनी आशाताईंच्या स्मृतीला विनम्र श्रद्धांजली वाहिली.

## व्हर्सटाईल गायिका अन् उत्तम कूक



**वैविध्यपूर्ण गाणी गाणाऱ्या आशा भोसले यांच्या हातालाही तितकीच सुरेख चव होती. खाण्यावर, खाऊ घालण्यावर त्यांचे प्रचंड प्रेम, याच प्रेमातून त्यांनी जगभरात रेस्टॉरंटची चेन उघडली. दुबई आणि कुवेतमध्ये 'आशाज' नावाचे त्यांचे रेस्टॉरंट आहे. यात हिंदुस्थानी खाद्यपदार्थ मिळतात. आशा भोसले यांनी स्वतः या रेस्टॉरंटमधील शेफना प्रशिक्षण दिले होते.**

## एका सुवर्णयुगाला विराम मिळाला



आशा भोसले यांच्या निधनाने हिंदुस्थानी संगीतविश्वातील अजरामर आवाज हरपला आहे. संगीताच्या एका सुवर्णयुगाला विराम मिळाला आहे, अशा भावना राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी व्यक्त केल्या. आशाताईंनी संगीतविश्वासाठी सहा दशकांहून अधिक काळ दिलेले योगदान अमूल्य आहे. त्यांच्या आवाजातली खुमारी, चपळता आणि भावनांची खोली ही त्यांची खरी ओळख ठरली. आज त्यांचा आवाज थांबला असला, तरी त्यांचे सूर सदैव घुमत राहतील, अशा शब्दांत त्यांनी श्रद्धांजली अर्पण केली.

## पुरस्कार

आशा भोसले यांना २000 साली दादासाहेब फाळके तर २००८ मध्ये त्यांना पद्मविभूषण पुरस्काराने गौरवण्यात आले. लोकप्रिय बंगाली गाण्यांसाठी पश्चिम बंगाल सरकारने २०१८ साली त्यांना बंग विभूषण तर २०२० मध्ये महाराष्ट्र सरकारचा सर्वोच्च सन्मान महाराष्ट्र भूषण पुरस्कार त्यांना देण्यात आला. याशिवाय दोन वेळा राष्ट्रीय पुस्कार आणि तब्बल ७ वेळा त्यांना फिल्मफेअर पुरस्कार देण्यात आला.

---

(टॉप टेन मराठी गाणी) चांदणे शिंपित जाशी, धुंदी कळयांना, सांज ये गोकुळी, मधु इथे अन् चंद्र तिथे, येरे घना... येरे घना, मागे उभा मंगेश, गोमू संगतीनं, रेशमाच्या रेघांनी, जांभूळ पिकल्या झाडाखाली, रुपेरी वाळूत माडांच्या बनात,

(टॉप टेन हिंदी गाणी) चुरा लिया है तुमने जो दिल को, दम मारो दम, पिया तू अब तो आजा, इन आँखों की मस्ती के, ओ मेरे सोना रे सोना रे, दिल चीज़ क्या है, आओ हुज़ूर तुमको, रंगीला रे..., आइए मेहरबां, सजना है मुझे सजना के लिए

## ओ.पी. नय्यर एस.डी यांची साथ

सुरुवातीलाआशाभोसलेयांच्याकारकिर्दीलाबिमलरॉय यांच्या'परिणीता'(१९५३)आणिराजकपूरयांच्या'बूटपॉलिश' (१९५४)याचित्रपटांतीलगाण्यांमुळेबळकटीमिळाली.परंतु, संगीतकारओ.पी.नय्यरयांच्याशीझालेलीभेटत्यांच्या आयुष्यातीलसर्वातमोठाटर्निंगपॉइंटठरला.सुरुवातीला ओ.पी.नय्यरयांचीपहिलीपसंतीगीतादत्तअसायच्या.पण 'सीआयडी'चित्रपटानंतरत्यांच्यासंगीतामध्येआशाभोसले यांनीआपलंस्थाननिर्माणकेलं.१९५७च्या'नयादौर' चित्रपटाच्यामाध्यमातूनत्यांनीमोठाइतिहासरचला.त्याच वर्षीम्हणजे१९५७मध्येसंगीतकारएस.डी.बर्मनआणिलता मंगेशकरयांच्यातमतभेदझाले.त्यामुळेआशाभोसले यांच्यासाठीयशाचीनवीनदारेउघडलीगेली.पुढीलपाचवर्षे एस.डी.बर्मनयांनीलतामंगेशकरयांच्यासोबतकामकेलंनाही. याकाळाततत्यांच्याकंपूमधीलमुख्यगायिकाम्हणूनआशा भोसलेउदयासआल्या.संगीतकारएस.डी.बर्मन,किशोर कुमार,आशाभोसलेआणिगीतकारमजरूहसुलतानपुरीया चौघांनीमिळूनरोमँटिकआणिखट्याळगाण्यांचंएकनवंयुग सुरूकेलं.'हालकैसाहैजनाबका'(चलतीकानामगाडी),'आँखों मेंक्याजी','छोडदोआँचल'(पेइंगगेस्ट)आणि'दीवानामस्ताना हुआदिल'(बंबईकाबाबू)अशीअनेकसुंदरगाणीआजही लोकांच्यालक्षातआहेत.

## दुःख व्यक्त करण्यासाठी शब्द अपुरे



आजचा दिवस केवळ भारतासाठीच नाही, तर जगभरातील संगीतप्रेमींसाठी अत्यंत दुःखद आहे. आमच्यासाठी आशाताई म्हणजे केवळ एक महान गायिका नव्हत्या, तर त्या आमच्या कुटुंबाचाच एक अविभाज्य भाग होत्या. आज जे दुःख होत आहे, ते व्यक्त करण्यासाठी शब्द अपुरे पडत आहेत. काळ जणू थांबला आहे असे वाटतेय. पण त्यांची अजरामर गाणी त्यांना कायम आमच्यात जिवंत ठेवतील. धन्यवाद ताई, आमचे आयुष्य तुमच्या सुरांनी आणि प्रेमाने समृद्ध केल्याबद्दल. तुमची खूप आठवण येईल, अशा भावना माजी क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर यांनी व्यक्त केल्या.

# पोलिसांवर 'हप्तेखोरी'चा आरोप करत संतप्त गोरक्षकांचे पोलिस ठाण्यातच ठिय्या आंदोलन



चोपडा येथे दगडफेकची घटना झाल्यानंतर शहर पोलिस ठाण्यात आंदोलन करताना गोरक्षक.

## चोपड्यात गोरक्षक व पोलिसांवर जमावाच्या दगडफेकीच्या घटनेनंतर तणाव

**चोपडा प्रतिनिधी** शहरातील रामपुरा भागातील कचरा डेपोजवळ कत्तलीसाठी नेले जाणारे ७० गोवंश पकडण्यासाठी गेलेले गोरक्षक आणि पोलिस कर्मचाऱ्यांवर जमावाने दगडफेक केल्याची खळबळजनक घटना सकाळी १० वाजेच्या सुमारास घडली. या घटनेनंतर संतप्त गोरक्षकांनी शहर पोलिस ठाण्यात तब्बल चार तास ठिय्या आंदोलन करत पोलिस प्रशासनावर हप्तेखोरीचे जाहीर आरोप केले. अखेर डीवायएसपींनी कारवाईचे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले. मानक प्राणी कल्याण संस्थेचे ज्ञानेश्वर महाजन (दादा माऊली), विश्व हिंदू परिषदेचे मनोज राजपूत, कुणाल अलई आणि आकाश भोई यांना रामपुरा भागात ७० गोवंश कत्तलीसाठी जात असल्याची गुप्त माहिती मिळाली होती. त्यांनी तातडीने जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी यांना याची कल्पना दिली. अधीक्षकांच्या उपविभागीय पोलीस अधिकारी अण्णासाहेब घोलप यांनी वैभव बाविस्कर, निलेश पाटील आणि विनोद पाटील या तीन कर्मचाऱ्यांना गोरक्षकांसोबत कारवाईसाठी पाठवले. यावेळी रामपुरा स्मशानभूमीच्या मागे कारवाई सुरू असताना, तेथील काही लोकांनी गोरक्षक आणि पोलिसांच्या अंगावर धावून येत दगडफेक केली. या गोंधळाचा फायदा घेत सर्व ७० गोवंश पळवून लावले.

चोपड्यात गोवंश कत्तल प्रकरणी गुन्हा दाखल ; १२ जनावरे ताब्यात : याप्रकरणी आदित्य विजय माळी

यांच्या तक्रारीवरून पोलिस मित्र म्हणून काम करणारा वसीम शेख मुस्तकीन, शेख बिरजू शेख इकबाल, मुजुर कुरेशी व अन्य पंधरा ते वीस आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी घटनास्थळी शोधमोहीम राबवून सायंकाळपर्यंत अंदाजे ३ लाख ६० हजार रुपयांचे १२ गोवंश ताब्यात घेतले असून जनावरे गोशाळेत जमा करण्यात आली आहेत. या आंदोलनात अनिल वानखेडे, गजेंद्र जयस्वाल, शरद पाटील, टिळक पाटील, श्याम परदेशी, मनीष गुजराथी, श्याम सोनार, रोहित निकम, राकेश लोहार, जितेंद्र महाजन, प्रवीण जैन यांच्यासह अनेक हिंदुत्ववादी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पोलिस प्रशासनावर आरोप अन् आंदोलन

**या घटनेनंतर राज्यातील विविध भागांतून आलेले गोरक्षक संतप्त झाले. त्यांनी चोपडा शहर पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मधुकर साळवे आणि त्यांच्या कर्मचाऱ्यांवर 'हप्तेखोरी' चे गंभीर आरोप केले. दीड लाख रुपये घेऊन गुरे सोडली आहेत, असा खळबळजनक आरोप आंदोलनस्थळी करण्यात आला. पोलिस निरीक्षक साळवे यांनी आंदोलनकर्त्यांना 'आतमध्ये टाका' असे म्हटल्याने वातावरण अधिकच चिघळले. परिणामी, २० ते २५ गोरक्षकांनी सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत कडक उन्हात पोलिस निरीक्षकांच्या दालनाबाहेर ठिय्या आंदोलन केले. यावेळी गोरक्षक पोलिस निरिक्षकांवर प्रच संतप्त झाले होते.**

# गिरणा बचावसाठी चाळीसगावात जनआक्रोश ; अवैध वाळू उपशाविरोधात सर्वपक्षीय एकवटले

**हॅलो जनता प्रतिनिधी**

तालुक्याची जीवनवाहिनी असलेल्या गिरणा नदीच्या अस्तित्वासाठी आणि प्रशासनाच्या नाकाखाली सुरू असलेल्या अवैध वाळू उपशाविरोधात सोमवारी शहरात भव्य 'जनआक्रोश मोर्चा' काढण्यात आला. जागरूक तरुण, सामाजिक संघटना, शेतकरी आणि सर्वपक्षीय पदाधिकाऱ्यांनी एकवटून 'गिरणा बचाव' मोहिमेचा एल्गार पुकारला. या मोर्चात माजी खासदार उन्मेष पाटील, राष्ट्रवादी जिल्हाध्यक्ष प्रमोद पाटील, तालुकाध्यक्ष ठुकाध्यक्ष दिनेश पाटील, शेतकी संघाचे अध्यक्ष शशिकांत साळुंखे, ज्येष्ठ पत्रकार किसनराव जोर्वेकर, नगरसेवक अभिषेक देशमुख, दिनेश बोरसे, घृष्णेश्वर पाटील, आपचे राहुल जाधव, राहुल पाटील, अमोल नानकर यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

आंदोलनादरम्यान आंदोलकांनीमहसूल विभाग, आरटीओ आणि पोलिस प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर जोरदार टीका केली. वाळू माफियांना प्रशासनाचे छुपे पाठबळ असल्याचा आरोप करत, आंदोलकांनी नदीपात्रातील उपसा तात्काळ थांबवण्याची मागणी केली.

मोर्चात सहभागी झालेले शिवसेना (शिंदे गट) नेते व माजी खासदार उन्मेष पाटील यांनी प्रशासनाचा खरपूस समाचार घेतला. रहिपुरी येथे वाळू उपशाचा ठेका बंद असतानाही मोठ्या प्रमाणावर उत्खनन सुरू असल्याचे पुरावे त्यांनी सादर केले. केवळ वाळूच नव्हे, तर एमआयडीसीलगतच्या खदानींमध्ये बेकायदेशीर मुरूम आणि दगड उत्खननामुळे मोठे खड्डे पडले असून, हा पर्यावरणाचा मोठा ऱ्हास असल्याचा आरोप त्यांनी केला.

## आंदोलन. • तालुक्यातील गिरणा नदीपात्रातून सुरू असलेली वाळू चोरी रोखण्याची केली मागणी



गिरणा बचाओ मोहिमेंतर्गत काढण्यात आलेल्या मोर्चात सहभागी झालेले सर्वपक्षीय पदाधिकारी तसेच गिरणा परिसरातील नागरिक

### वाळू उपशामुळे पाण्याचा प्रश्न झाला गंभीर

**गिरणा नदीच्या पात्रातून होणाऱ्या अतोनात वाळू उपशामुळे शेती आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. जर प्रशासनाने ठोस पावले उचलली नाहीत, तर हे आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा गिरणा बचाव मोहिमेच्या वतीने देण्यात आला आहे. यावेळी रहिपुरी येथे जप्त केलेली १०४४ ब्रास वाळू ही 'घरकुल' लाभार्थ्यांना देण्यात येणार असल्याचे नायब तहसीलदार संदेश निकुंभ यांनी यावेळी स्पष्ट केले**

### नदीपात्रात सीसीटीव्ही बसवत, गस्त वाढवण्याची मागणी

**मेहुणबारे, मांदुरणे, उपखेड वर एव रहिपुरी परिसरात कायमस्वरूपी सीसीटीव्ही कॅमेरे लावून गस्ती पथके नेमण्यात यावीत. वाळू डंपरमुळे झालेल्या अपघातात मृत्यू पावलेल्यांच्या कुटुंबीयांना विशेषतः दसेगाव फाट्याजवळील अपघातात मृत्यू झालेली रहिपुरी येथील विद्यार्थिनीच्या कुटुंबीयांना तातडीने मदत मिळावी. अवैध उत्खननाची व्याप्ती तपासण्यासाठी महसूल विभागाने तात्काळ ईटीएस मोजणी करावी. अशी मागणी करण्यात आली.**

## कजगाव येथे महात्मा फुले जयंतीनिमित्त समता व शिक्षणाचा संदेश



कजगाव येथील जिल्हा परिषद उर्दू शाळेत क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त उत्साहपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन महात्मा फुले समता परिषद व अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून झाली. यावेळी महात्मा ज्योतिबा फुले, आई सावित्रीबाई फुले तसेच शेख फातिमा यांसारख्या थोर समाजसुधारकांच्या विचारांचा गौरवपूर्ण उल्लेख करत त्यांच्या कार्याचे महत्त्व उपस्थितांना सांगण्यात आले. या प्रसंगी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. कार्यक्रमाला अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष भानुदास महाजन, अमिन शहा (पत्रकार), शाळा समिती अध्यक्ष अन्वर तांबोळी, मुख्याध्यापिका शेख बुरानुद्दीन, मोईनुद्दीन, सादिया बेगम, खलील अहमद शाहीना, आफिफ खान, शिक्षकवर्ग तसेच ग्रामस्थ भास्कर मोरे, भिकन महाजन, राजेंद्र महाजन, यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शेख बुरानुद्दीन सर यांनी केले, तर आभार प्रदर्शन शाहीना खान यांनी मानले.










## संघर्षाचा विजय : १२ वर्षांच्या अथक प्रयत्नांनंतर उमेश भोई यांची पोलिस दलात झाली निवड



अपयश हेच यशाची पहिली पायरी असते याचा जिवंत उदाहरण ठरले आहे. येथील उमेश श्रावण भोई याचा २०१४ पासून सुरू झालेला संघर्ष अखेर २०२६ मध्ये संपला असून, ठाणे शहर पोलीस दलात त्यांची निवड झाली आहे. गेल्या १२ वर्षांत उमेश भोई यांनी अपयशाचे अनेक चटके सहन केले. पोलिस भरतीमध्ये प्रत्येक वेळी केवळ १-२ गुणांनी अपयश येत असतानाही त्यांनी कधीही हार मानली नाही. २०१४ साली वडिलांना लखवा झाल्यानंतर घरची संपूर्ण जबाबदारी त्यांच्या खांद्यावर आली. तरीही त्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा सुरूच ठेवली. २०२६ हे वर्ष त्यांच्यासाठी शेवटची संधी होती. वयाची ३२ वर्षे पूर्ण होत असताना त्यांनी अखेरच्या प्रयत्नात पूर्ण ताकद लावली आणि त्या संधीचे सोने करत ठाणे शहर पोलीस दलात स्थान मिळवले. उमेश भोई यांचा हा प्रवास अनेक तरुणांसाठी प्रेरणादायी आहे. कितीही अपयश आले तरी जिद्द, मेहनत आणि आत्मविश्वास असेल तर यश नक्की मिळते, हे त्यांनी आपल्या कर्तृत्वातून सिद्ध करून दाखवले आहे.




## आदर्श कन्या शाळेत वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त आदर्श कन्या विद्या मंदिर येथे भारतीय बौद्ध महासभा यांच्या वतीने भव्य वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेचा विषय महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर आधारित होता. विद्यार्थ्यांनी दोन्ही महापुरुषांच्या विचारांवर प्रभावी मांडणी करत उपस्थितांची दाद मिळवली. कार्यक्रम उद्घाटन युवराज सूर्यवंशी तर अध्यक्षस्थानी धम्मपाल सुरवाडे होते. प्रमुख अतिथी म्हणून भडगाव तालुक्याचे गट शिक्षणाधिकारी रावसाहेब पाटील उपस्थित होते. या स्पर्धेत सुमनताई गिरीधर पाटील विद्यालय, काकासाहेब पूर्णपात्रे विद्यालय चाळीसगाव, लाडकूबाई माध्यमिक विद्यालय, एम.एम.कॉलेज पाचोरा, शिंदे इंटरनॅशनल पाचोरा, जामनेर विद्यालय तसेच आदर्श कन्या आदर्श कन्या विद्यालयात वक्तृत्व स्पर्धेस उपस्थित शिक्षक व विद्यार्थी. विद्यालय येथील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. परीक्षण उज्वला देवकर व महेंद्रकुमार सावकारे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी केंद्रप्रमुख अशोक खेडकर, रवींद्र जाधव, जुलाल सोनवणे, राहुल जाधव, दिपक केदार, जाकीर कुरेशी, संजय सोनार कळवाडीकर, प्रवीण पाटील, दयाराम वाघ तसेच माजी नगरसेविका योजना पाटील यांचे सहकार्य लाभले. भारतीय बौद्ध महासभा पदाधिकारी दिनकर वाल्हे, रेखा वाल्हे, प्रभाकर पवार व प्रा.बी.एस. भालेराव यांचे मार्गदर्शन लाभले.

## जि.प. उर्दू शाळेमध्ये शैक्षणिक साहित्याचे वाटप

जिल्हा परिषद उर्दू शाळा, नगरदेवळा येथे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात कुराण पठणाने झाली. या कार्यक्रमाला जिल्हा परिषद सदस्य आणि शिवसेना जिल्हाप्रमुख रावसाहेब पाटील उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून समाजसेविका अभिलाषा रोकडे आणि शेख रहीम भाई मियाँ उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शेख जावेद रहीम यांनी केले. यावेळी विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणांतून बाबासाहेबांच्या जीवनावर आणि त्यांच्या कार्यावर प्रकाश टाकला. जावेद रहीम यांनी सांगितले की, बाबासाहेबांनी शिक्षणाला वाघिणीचे दूध म्हटले आहे. आपण उच्च शिक्षण घेऊन स्वतःला सक्षम बनवले पाहिजे, जेणेकरून आपण समाजाची आणि देशाची सेवा करू शकू. शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष वसीम शेख यांच्यातर्फे १०० विद्यार्थ्यांना गुलजारे उर्दू पुस्तकांचे वाटप करण्यात आले. तर अभिलाषा रोकडे यांच्याकडून शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. तसेच, अधिक पुस्तके खरेदी करण्यासाठी रावसाहेब पाटील यांनी शाळेला ५ हजार रुपये रोख स्वरूपात मदत जाहीर केली. कार्यक्रमासाठी वसीम शेख, सय्यद इमरान अली, उमर बेग, मुश्ताक खान, नासिर सय्यद व इतरांनी सहकार्य केले. आभार शेख जावेद रहीम यांनी मानले.

साप्ताहिक "हॅलो जनता" हे वृत्तपत्र मालक, प्रकाशक, मुद्रांक, संपादक श्री. प्रमोद रूले यांनी 'दर्शन ऍडव्हटाईजमेंट' यांच्या संयुक्त विद्यमाने जळगांव येथे मुद्रीत करून जळगांव येथून ऑनलाइन प्रकाशित केले. (वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकूराशी मालक, प्रकाशक, मुद्रांक, संपादक व सहसंपादक मंडळ सहमत असतीलच असे नाही.) जळगांव न्यायालयीन कक्षांतर्गत.
The weekly "Hello Janata" was printed by the newspaper owner, publisher, stamp, editor Mr. Pramod Rule in Jalgaon in association with 'Darshan Advertisement' and published online from Jalgaon. (The owner, publisher, stamp, editor and co-editors do not necessarily agree with the content published in the newspaper.) Under the Jalgaon Judicial Cell.